# नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९६३ /२०२४ दि. ०७/०९/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, नारपोली** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. नमूद कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई, ठाणे, कळवा, मुंब्रा कडून नारपोली वाहतूक उपविभागाचे हद्दीत माणकोली/कशेळी मार्गे गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **माणकोली व कशेळी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने माणकोली – भिवंडी – वडपे मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) नाशिक कडून गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **वडपे नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने वडपे नाका येथे यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) गुजरात कडून मुंबई, ठाणे, कळवा, मुंब्रा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **जव्हार फाटा, मनोर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मनोर – विक्रमगड – वाडा – वडपे नाका – भिवंडी – खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०८/०९/२०२४ रोजी (दीड दिवसाचे), दि. ११/०९/२०२४ रोजी (पाच दिवसाचे), दि. १२/०९/२०२४ (गौरी व गणपती), दि. १३/०९/२०२४ रोजी (सात दिवसाचे) व दि. १७/०९/२०२४ रोजी (अनंत चतुर्थी) या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेतील वाहने व गणपती मूर्ती विसर्जनातील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिक, भिवंडी
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u>** :-
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत</u>** :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/- सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/- सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**<u>प्रत</u>** :- सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/- म.न.पा.भिवंडी निजामपूरा शहरा च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner